

आज घटस्थापना

लक्ष्मीचा वरदहस्त
सरस्वतीची साथ
माता दुर्गेच्या आशीर्वादाने
तुमचे जीवन होवो आनंदमय

नवरात्रोत्सवाच्या
हार्दिक
शुभेच्छा!



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



बोअरवेल सबमर्सिबल पंपसेटस् www.lubipumps.com

50+ YEARS OF PUMPING TRUST

CUSTOMER CARE NO. 9824200800

Lubi

PUMPS-MOTORS



महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
"A" ग्रेड मान्यता
प्राप्त प्रमाणपत्र

गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर

Ph- 0217-2725363, M.:9423590463/ 9423588463



www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ३ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# बंद लिफाफ्यात दडलंय काय?


✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर जिल्ह्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या मनातील उमेदवार कोण, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी भाजपने निवडक पदाधिकाऱ्यांकडून संभाव्य तीन उमेदवारांची नावे बंद लिफाफ्यात मागण्याचा प्रयोग सुरू केला आहे. ही प्रक्रिया विधानसभा मतदारसंघ निहाय राबविण्यात येत आहे. मंगळवेढा-पंढरपूर आणि शहर मध्यसाठी नावे मागवण्यात आली मंगळवेढा- पंढरपूरसाठी प्रशांत परिचारक आणि शहर मध्यसाठी देवेंद्र कोठे आणि पांडुरंग दिड्डी यांना पदाधिकाऱ्यांनी पसंती मिळाल्याची माहिती सूत्रांनी दिली.**



## मंगळवेढा-पंढरपूरसाठी प्रशांत परिचारक तर मध्यसाठी दिड्डी, कोठे, सातपुतेंना पसंती

## कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर



## ताकही फुंकून पिण्याची श्रेष्ठींवर नामुष्की

कार्यकर्त्यांच्या मनातील उमेदवार जाणून घेण्यासाठी राज्यभरात संभाव्य उमेदवारांची नावे बंद लिफाफ्यात मागण्याचा प्रयोग भाजप करत आहे. बुधवारी पंढरपूर-मंगळवेढा आणि शहर मध्य मतदारसंघासाठी ही प्रक्रिया पार पडली. मंगळवेढा-पंढरपूर मतदारसंघ निरीक्षकपदी आ. महेश लांडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मंगळवेढा येथे गुप्त मतदान घेण्यात आले. मतदार संघातील ९७ प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. मात्र मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परिचारक समर्थक भाजप पदाधिकाऱ्यांनी उघडपणे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनाच भाजपाची उमेदवारी देण्याची मागणी पक्षनिरीक्षक तथा आमदार लांडगे यांच्याकडे केल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर शहर मध्यचे निरीक्षक म्हणून धर्मेंद्र कांडरे यांनी काम पाहिले. यावेळी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, शहर मध्ये संयोजक दत्तात्रय गणपा, यांच्यासह ज्येष्ठ नेते पांडुरंग दिड्डी यांच्यासह माजी नगरसेवक माजी महापौर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

शहर मध्य मधील माजी नगरसेवक भाजपचे शहर जिल्ह्याचे पदाधिकारी, मंडल विभागाचे पदाधिकारी असे एकूण ११५ मतदान होते. त्यापैकी सुमारे ८९ पदाधिकाऱ्यांनी मतदान केल्याची माहिती मिळाली.

शहर उत्तरमध्ये पद्मशाली समाजाचे सर्वाधिक पदाधिकारी असल्याने त्यांच्यातून माजी विरोधी पक्षनेते पांडुरंग दिड्डी यांच्यासह युवा नेते देवेंद्र कोठे, माळशिरसचे राम सातपुते यांना पदाधिकाऱ्यांनी पसंती दिल्याचे सांगण्यात आले. शिवानंद पाटील, श्रीनिवास संगा, अंबादास गोरंटला हे सुद्धा इच्छुक असून त्यांनाही काही पदाधिकाऱ्यांनी पसंती दिल्याची माहिती आहे.

दरम्यान, मंगळवारी सोलापूर दक्षिणसाठी निरीक्षक म्हणून आ. सिद्धार्थ शिरोळे यांनी काम पाहिले. दक्षिणसाठी दक्षिण मधील बहुतेक पदाधिकाऱ्यांनी आमदार सुभाष देशमुख त्यांचे सुपुत्र मनीष देशमुख व रोहन देशमुख यांना अनुक्रमे पसंती क्रमांक दिल्याची चर्चा आहे.

### अक्कलकोटच्या काहीजणांचे मतदान सोलापुरात

विधानसभा मतदारसंघातील काही मतदारांचे मतदान सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात घेतल्याचे सांगण्यात आले. अक्कलकोटसाठी आ. माधुरी मिसाळ यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. पात्र मतदारांना मतदानाचा निरोपच देण्यात आला नाही, असा आरोप निरीक्षक आमदार माधुरी मिसाळ यांच्याकडे करण्यात आल्यानंतर आ. मिसाळ यांनी अक्कलकोट मतदारसंघातील काही मतदारांचे मतदान सोलापूर येथील शासकीय विश्रामगृहात घेतल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे यांनी सांगितले.

### दोन्ही देशमुखांसह कल्याणशेट्टींकडेही मतदारसंघाची जबाबदारी

भाजपाने आ. विजयकुमार देशमुख यांची शिराळा, आ. सुभाष देशमुख यांनी मिरज तर आ. सचिन कल्याणशेट्टी यांची इचलकरंजी यां विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी दिली होती. त्यांनी मतदारसंघात जावून पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली.

### कार्यकर्त्यांची कदर...

लोकसभा निवडणुकीत भाजपचा जबर पराभव झाला.त्याची कारणे जेव्हा शोधण्यात आली,तेव्हा एक मोठे कारण समोर आले. श्रेष्ठींनी उमेदवार ठरवताना स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले नाही,अशी तक्रार श्रेष्ठींकडे करण्यात आली.त्याची दखल केंद्रीय पातळीवर घेतली गेलीय.लोकसभेत जे झाले ते विधानसभेत नको म्हणून भाजपच्या प्रदेश शाखेने पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवूनच उमेदवार निश्चित करण्याचा नवा फंडा आखल्याचे सांगण्यात आले. दूध पोळल्यानंतर ताकही फुंकून प्यावे लागते, असे म्हणतात. त्याप्रमाणे भाजप श्रेष्ठींवर ही नामुष्की ओढवल्याची चर्चा जाणकारांमधून होत आहे.

---

# नदीत बुडून दोघा मित्रांचा मृत्यू एक बचावला; अकलूज येथील घटना



अनिकेत जाधव प्रकाश वाडेकर

✔ **माळीनगर** : पोहण्यासाठी गेलेल्या दोघा मित्रांचा नदीत बुडून मृत्यू झाला. तिघा मित्रांपैकी एकजण बेशुद्धावस्थेत आहे. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास सराटीजवळच्या नीरा नदीत ही दुर्दैवी घटना घडली. अनिकेत उर्फ निखिल कुंडलिक जाधव (वय २०) व प्रकाश चंद्रकांत वाडेकर (वय १५) अशी त्या दोघांची नावे आहेत.

अकलूज (ता. माळशिरस) येथील वडार गल्लीतील मरिबा औंदुबर काळे (वय २१), अनिकेत व प्रकाश हे तिघे मित्र मंगळवारी मोटारसायकलवरून सराटी-अकलूज बंधाऱ्याजवळील नीरा नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेले होते. मरिबा काळे यास पोहता येते होते. अनिकेत जाधव आणि प्रकाश वाडेकर हे दोघेही पोहण्यासाठी नदीत उतरले. यापैकी प्रकाश वाहून जाऊ लागल्याने त्याला वाचवण्यासाठी अनिकेत गेला. परंतु दोघेही खोल पाण्यात बुडाले. हे दृश्य पाहून तिसरा मित्र मरिबा काळे तेथेच बेशुद्ध पडला.

घटनेची माहिती मिळताच अकलूजचे पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच अकलूज नरपरिषदेचे सीईओ दयानंद गोरे यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि शोध मोहीम सुरू केली.

शोध मोहिमेत अनिकेत जाधव याचा मंगळवारी सायंकाळी मृतदेह सापडला. परंतु रात्री उशिरापर्यंत शोध मोहीम घेऊन सुद्धा प्रकाशचा मृतदेह सापडला नाही. त्याचा मृतदेह बुधवारी सापडल्याची माहिती मिळाली. बेशुद्ध पडल्यानंतर मरिबा काळे याच्यावर अकलूजच्या प्राथमिक रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# कुर्डुवाडी पालिकेतील अभियंत्याला मारहाण

## दोघांविरूद्ध गुन्हा दाखल

✔ **कुर्डुवाडी** : कुर्डूवाडी नगरपालिकेतील बांधकाम विभागाच्या अभियंत्याला नगर परिषदेच्या कार्यालयात येऊन मनसे पदाधिकारी व एक अनोखी व्यक्तीने मारहाण केली. ही घटना दि.१ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी घडली.

### कर्मचारी संघटनेकडून निषेध

या मारहाणीचा निषेध पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केला आहे.कार्यालयात असे प्रकार वारंवार घडत असल्याची तक्रार कर्मचारी संघटनेने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात कुर्डुवाडी नगरपरिषदेचे बांधकाम अभियंता अक्षय खटके यांनी फिर्याद दाखल केली. मंगळवारी रात्री उशीरा दोघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

मनसेचे माढा - करमाळा विधानसभा अध्यक्ष संशयित आकाश लांडे (रा. कुर्डूवाडी) आणि अनोळखी एका व्यक्ती विरोधात सरकारी कामात अडथळा आणला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बांधकाम विभागाचे अभियंता अक्षय खटके त्यांच्या कार्यालयात असताना मनसेचे माढा - करमाळा विधानसभा अध्यक्ष आकाश लांडे आणि अनोळखी एक रस्त्यासंबंधी दोन तक्रारी अर्ज घेऊन आले होते.

यावेळी चर्चा सुरू असताना एकजण व्हिडिओ चित्रिकरण करत होता.त्यावेळी झालेल्या वादात बांधकाम विभागाचे अभियंता अक्षय खटके यांच्या गचुरीला धरुन एकाने गालात दोन चापट्या मारुन छातीत बुक्की मारून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याने तक्रारीत म्हटले आहे.



मनसेचे आकाश लांडेसह आणखी एका अनोळखी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ए.एस.आय लोंढे हे करीत आहेत.

# चोरलेला टँकर परत देण्यासाठी ४० लाखांची खंडणी

## सातजणांवर गुन्हा; चौघांना अटक

✔ **मोहोळ** : पेट्रोल पंपात पार्किंगसाठी ठेवलेला टँकर चोरला आणि तो परत देण्यासाठी मालकास पोलीस केस करण्याची धमकी देत ४० लाख रुपयांची खंडणी मागितल्याची घटना चिंचोळी एमआयडीसी येथील भागवत पेट्रोल पंप येथे शनिवारी घडली. याप्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला तर चौघांना अटक केली. आरोपींना न्यायालयाने २ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश रविवारी दिला. यासंदर्भात व्यंकटेश राजाराम चिंताकिंदी (रा. वालचंद कॉलेज जवळ) यांनी फिर्याद दाखल केली. पोलिसांनी रवी जगताप, विशाल कांबळे, हनुमंत गवळी, हनुमंत वैजनाथ गुरव (सर्व रा.मार्डी), राहुल मनोहर चेन्नूर (रा जोडभावी पेठ ) आणि विशाल कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. व्यंकटेश यांनी त्यांचा केमिकल वाहतुकीचा टँकर गेल्या तीन महिन्यांपासून चिंचोळी येथील भागवत पेट्रोल पंपाच्या पार्किंगमध्ये ठेवला होता. तो टँकर २८ सप्टेंबर रोजी रात्री चोरीस गेला. त्यानंतर आरोपींनी व्यंकटेश यांचा मित्र अरुण तलवार यांना फोन करून तुम्ही टँकरमधून बेकायदेशीररित्या केमिकल युक्त पाण्याची विल्हेवाट लावता. हा प्रकार पोलिसांना सांगून तुमचे विरोधात आम्ही तक्रार देणार आहोत. नसेल तर आम्हाला हप्त्या द्या. टँकर सोडण्यासाठी ४० लाखांची खंडणी द्या. अशी मागणी करून धमकी दिली होती.


# पेट्रोल ओतून पत्नीची दुचाकी जाळली; पती फरार

✔ **सोलापूर** : विभक्त राहणाऱ्या पत्नीच्या कामाच्या ठिकाणी जाऊन तिच्या दुचाकीवर पेट्रोल ओतून आग लावण्यात आली. ही घटना भांडेगल्ली परिसरातील नेमचंद जैन आयुर्वेदिक रुग्णालयाच्या आवारात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.

या संदर्भात गीतांजली गोपाल द्यावरकोंडा (वय ४२ रा. दत्तनगर) यांनी फौजदार चावडी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांच्या पती गोपाल रामकृष्ण द्यावरकोंडा (रा.रविवार पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गीतांजली या पतीबरोबर पटत नसल्याने विभक्त राहतात. त्या जैन आयुर्वेदिक रुग्णालयात कामाला आहेत. मंगळवारी दुपारी गोपाल हा रुग्णालयात आला होता. तू माझा मोबाईलचा नंबर ब्लॉक का केली ? असे म्हणून त्यांच्याशी भांडण केले. त्यानंतर पत्नीस दुचाकीची मागणी केली. गितांजली यांनी दुचाकी देण्यास नकार दिला. तेंव्हा त्यांनी सोबत आणलेले पेट्रोलचे बाटली एमएच१३-सिडी- ६५५३ या क्रमांकाच्या दुचाकीवर पेट्रोल ओतून आग लावली. गीतांजली या घटनास्थळी आल्या असता त्यांनस पेट्रोल ओतून जाळतो, अशी धमकी देऊन तो निघून गेला.या आगीत गीतांजली यांची दुचाकी जळून १५ हजारांचे नुकसान झाले. अशी नोंद पोलिसात झाली. तपास हवालदार कामुर्ती करीत आहेत .

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




**जा त्यांना माझा निरोप द्या!!!**


| कल्याण |
|---|
| 770-47-250 |

| मुंबई |
|---|
| 268-67-278 |

# आजपासून नवरात्रोत्सवाचा माहोल; तबब्ल १८५ मिरवणुका निघणार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**वर्षातील सर्वात मोठा सण असलेल्यापैकी एक नवरात्रोत्सवास गुरूवार ३ ऑक्टोंबरपासून सुरूवात होत आहे. यासाठी भक्तांसह पोलिसही सज्ज झाले आहेत. शहरात ४०० सार्वजनिक मंडळांकडून देवीची प्रतिष्ठापना कारण्यात येणार आहे तर १८५ एवढ्या मंडळाच्या मिरवणुका निघणार आहेत तर दुसरीकडे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात १८०० पोलिस बंदोबस्तास तैनात आहेत.**



सोलापूर शहरात नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा केला जातो. यानिमित्त शहरात जवळपास १८५ एवढ्या मंडळाच्या मिरवणुका पहायला मिळणार आहेत. सर्व मिरवणुका डीजे मुक्त असणार आहेत. मिरवणुकीनिमित्त पोलिसांनीही चोख बंदोबस्त शहरात लावला आहे. यंदाच्यावर्षी प्रत्येक मंडळाच्या मिरवणुकीच्या वाहनात एक पोलिस असणार आहेत. डेसीबलवर नियंत्रण राहण्यासाठी पोलिस आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. अनेक ठिकाणचे वाहतूक मार्ग मिरवणुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत.

## शहरात १ हजार ८० पोलिसांचा बंदोबस्त

### असा असणार पोलीस बंदोबस्त

गणपती विसर्जन निमित्त शहरात १८०० पोलिसांचा असणार असणार आहे. यामध्ये पोलीस उप आयुक्त ३, पोलीस आयुक्त ५, पोलीस निरीक्षक १२, सहायक पोलीस निरीक्षक- फौजदार : ४८, पोलीस अंमलदार : ८७०, एसआरपीएफ कंपनी : १, होमगार्ड : ८०० असा बंदोबस्त असणार आहे.

### हा मार्ग असणार वाहतुकीसाठी बंद

सम्राट चौक ते रूपाभवानी चौक, मड्डी वस्ती, बलिदान चौक, हायवे बायपास क्रॉस क रोडकडून रूपाभवानी मंदिराकडे येणारे रस्ते बंद केले जातील. सम्राट चौक-कारंबा नाका, जुना तुळजापूर नाका, मड्डी वस्तीमार्गे वाहने ये-जा करू शकतील. बलिदान चौक, कुंभार वेस, घोंगडे वस्ती, जोडभावी चौकी ते मड्डी वस्तीमार्गे पुढे रस्ता चालू राहणार आहे.

मिरवणुकीमध्ये प्लाझ्मा, बीम लाईट, आणि लेझर बीम लाईटचे वापरावर निर्बंध घालावे. या गोष्टी निदर्शनास आल्यास कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी दिला आहे.



### बीम लाईट, लेझरवर निर्बंध

मिरवणूक पाहण्यासाठी लहान मुले, जेष्ठ नागरिक, गर्दी करतात. त्यामुळे मिरवणुकीत बीम लाईट आणि लेझरवर निर्बंध घालण्यात आले आहेत. यामुळे डोळ्यास इजा होऊन, डोळा कायमचा निकामी होण्याची शक्यता आहे. बीम लाईट, लेझरवर निदर्शनास आल्यास मंडळावर कारवाई करण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत.